जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ५५३ दिनांक - १६/०७/२०२३**

## लोणीकंद पोलीस स्टेशन,पुणे शहर

## लोणीकंद पोलीस स्टेशन हद्दीतील सराईत गुन्हेगार ०१ वर्षासाठी तडीपार

लोणीकंद पोलीस स्टेशन कडील रेकॉर्डवरील गुन्हेगार **सागर कुमार गायकवाड, वय-३३ वर्षे,रा.अमर चौक केसनंद,ता.हवेली,जि.पुणे** यांस पोलीस उपायुक्त परिमंडळ ०४,पुणे शहर,श्री.शशीकांत बोराटे यांनी **महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६(१)(अ)(ब) प्रमाणे पुणे जिल्ह्यातुन ०१ वर्षाकरीता तडीपार केले आहे.**

लोणीकंद पोलीस स्टेशन हद्दीतील केसनंद तसेच आसपासच्या भागात दहशत निर्माण करुन,लोकांना तसेच सामान्य नागरीकांना वारंवार त्रास देणाऱ्या,दहशत निर्माण करुन लोकांच्या जिवीतास धोका निर्माण करणाऱ्या सराईत गुन्हेगाराच्या कृत्यामुळे लोकांच्या मनातुन कायद्याविषयी संभ्रम निर्माण होवु नये,तसेच सदर सराईत गुन्हेगारावर कायद्याचा वचक बसावा या उद्देशाने सदर इसमावर मा.सहा.पोलीस आयुक्त,श्री.संजय पाटील,लोणीकंद पोलीस स्टेशनचे तत्कालीन वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.गजानन पवार यांचे मार्गदर्शनाखाली, पोलीस उपनिरीक्षक,रामकृष्ण दळवी, पोलीस अंमलदार,प्रशांत कापुरे, सागर कडु यांनी सदर सराईत इसम याचेवर दाखल गुन्ह्यांचा अभिलेख तपासुन सागर गायकवाड यास महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ प्रमाणे तडीपार करणेबाबत मा.पोलीस उपायुक्त,श्री.शशिकांत बोराटे यांना प्रस्ताव पाठविला असता,त्यांनी सदर सराईतास पुणे जिल्ह्याचे हद्दीतुन एक वर्षाकरीता तडीपार केले आहे.

सदरची कामगिरी मा.अप्पर पोलीस आयुक्त,श्री.रंजन कुमार शर्मा, मा.पोलीस उपायुक्त,श्री.शशिकांत बोराटे, मा.सहा.पोलीस आयुक्त,श्री.संजय पाटील, तत्कालीन वरिष्ठ पोलीस निरीक्षक,गजानन पवार व वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.विश्वजित काइंगडे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक,रामकृष्ण दळवी, पोलीस अंमलदार, प्रशांत कापुरे, सागर कडु यांनी केली आहे.

**सदरचे तडीपार इसम हे पुणे जिल्ह्याचे परिसरात आढळुन आल्यास,त्यांची माहीती लोणीकंद पोलीस स्टेशन पुणे शहर संपर्क क्र.९५२७०६९१०० याचेवर कळविण्याचे आवाहन लोणीकंद पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री. विश्वजित काइंगडे यांनी केली आहे.**